# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

**जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रुम नं.१,२,५ व ६,**
**हजारीमल सोमाणी मार्ग, सि.एस.टी.स्टेशन समोर, मुंबई-४०० ००१**
☎ **०२२-२२०५ ७४०९/ २२०७ २०९७/ २२०१ ८५३९ (फॅक्स) E-mail : *mah-sforum@nic.in***


क्र.राआ/महा./आस्था-३/ब व प/अध्यक्ष जि.मं./२०१५/६६३० दिनांकः- ०८/१०/२०१५

**वाचा** ः- १) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व त्याखालील नियम
२) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्य गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०११
३) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.
(अ) राआ/महा./आस्था-३/ब व प/अध्यक्ष जि.मं./२०१५/६४७६, दि.३०.०९.२०१५
(ब) राआ/महा./आस्था-३/नि व प/अध्यक्ष जि.मं./२०१५/६४७८, दि.०१.१०.२०१५
(क) राआ/महा./आस्था-३/नि व प/अध्यक्ष जि.मं./२०१४/४९२४, दि.१९.०८.२०१४
४) श्री.एम.जी.चिलबुले, अध्यक्ष, जिल्हा मंच, नागपूर यांचा दि.०१.१०.२०१५ चा अर्ज
५) श्री.रामलाल भ.सोमाणी यांचा दि.०७.१०.२०१५ चा अर्ज

## -ः कार्यालयीन आदेश ः-

वरील क्र.३ (अ) वर दर्शविलेल्या कार्यालयीन आदेशान्वये श्री. एम. जी. चिलबुले, अध्यक्ष, जिल्हा ग्राहक मंच, नागपूर यांची प्रशासकीय कारणास्तव यवतमाळ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर बदलीने पदस्थापना करण्यात आलेली होती. तसेच वरील क्र.३ (ब) वर दर्शविलेल्या कार्यालयीन आदेशान्वये श्री. रामलाल भ. सोमाणी यांची यांची नागपूर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षपदावर वरील श्री.चिलबुले यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदावर पुनर्नियुक्तीने पदस्थापना करण्यात आलेली होती.

तथापि वरील क्र.४ च्या अर्जान्वये श्री.चिलबुले यांनी कौटूंबिक कारणास्तव त्यांची यवतमाळ जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर वरीलप्रमाणे बदलीने करण्यात आलेली पदस्थापना रद्द करण्याबाबत विनंती केली आहे. तसेच वरील क्र.५ च्या अर्जान्वये श्री.रामलाल भ. सोमाणी यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षपदांवर पुनर्नियुक्ती स्विकारण्यास असमर्थता दर्शविली आहे.

सबब प्रशासकीय निकड लक्षात घेऊन श्री.म.गो.चिलबुले यांची वरील क्र.३ (अ) च्या कार्यालयीन आदेशान्वये यवतमाळ जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर बदलीने करण्यात आलेली पदस्थापना याद्वारे रद्द करण्यात येत असून ते नागपूर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षपदावरच काम करतील. तसेच उक्त श्री.सोमाणी यांनी जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर रुजू होण्यास असमर्थतता दर्शविल्याने त्यांची नागपूर जिल्हा मंचाच्या अध्यक्षपदावर पुनर्नियुक्तीने पदस्थापना करण्याबाबतचे वरील क्र.३ (ब) चे कार्यालयीन आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

तसेच यवतमाळ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाचे कामकाज या कार्यालयाच्या वरील क्र.३ (क) च्या आदेशाप्रमाणे पुढील आदेशापर्यंत करण्यात यावे.

हे आदेश मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांचे पूर्वमान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

ASW
08/10/15

(अनुजा सा. वैरागडे )
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

प्रति,
श्री. एम. जी. चिलबुले,
मा.अध्यक्ष,
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर

**प्रतिलिपी** ः

१) मा.श्री. बी. ए. शेख, न्यायिक सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र तथा पालक सदस्य, जिल्हा मंच, नागपूर, वर्धा व यवतमाळ
२) मा.न्यायिक सदस्य व मा.सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र
३) श्री.पी.एल.जाधव, अध्यक्ष, जिल्हा मंच, वर्धा तथा प्रभारी अध्यक्ष, जिल्हा मंच, यवतमाळ
४) मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) मा.सदस्य व मा.सदस्या, जिल्हा मंच, नागपूर, वर्धा व यवतमाळ
६) श्री.रामलाल भंवरलाल सोमानी, सोमानी भवन, मनकर्णा प्लॉटस, अकोला-४४४ ००१ (मार्फत प्रबंधक, जिल्हा मंच, अकोला)
७) प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ
८) प्रबंधक, जिल्हा मंच, नागपूर, वर्धा व यवतमाळ यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव
९) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर, वर्धा व यवतमाळ (मार्फत प्रबंधक संबंधित जिल्हा मंच)